# सती

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**सती : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब–३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये १९०/–

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# सती

# सतीची कुलकथा

सती ही एक सत्यकथा आहे. ह्या सत्यकथेत काही फेरफार मी केले आहेत. परंतु कथेचा आत्मा प्रत्यक्ष सृष्टीतील आहे. १९२३ साली मी अमळनेरच्या तत्त्वज्ञानमंदिरात काही महिने विद्यार्थी म्हणून होतो. त्या वेळेस तेथे एक ब्रह्मचारी बोवा होते. त्यांच्या मातु:श्रीही तेथे होत्या. माताजी मोठ्या तेजस्वी दिसत. त्यांना हा एकच मुलगा. त्या गतधवा होत्या. आपल्या मुलाला त्यांनी लहानाचे मोठे केले. मुलगा पुढे ब्रह्मवादी व वेदान्ती व्हावा, अशी त्या मातेची स्पृहणीय इच्छा होती. अत्यंत आपत्तीतून तिने दिवस नेले होते. त्या मूळच्या म्हैसूर-कर्नाटकाकडच्या. शंकराचार्यांच्या मठातही त्या काही दिवस आपल्या तरुण पुत्रास घेऊन राहिल्या होत्या.

एखाद्या प्रखर संन्यासिनीप्रमाणे माताजी दिसत. त्यांच्या तोंडावर एक प्रकारची ज्वलंत पवित्रता होती. आम्ही काही विद्यार्थी त्यांच्या जवळ कधी कधी बोलत बसत असू. त्या वेळेस त्या जीवनातील नानाविध अनुभव सांगत. ते अनुभव ऐकताना कधी आम्हास गहिवर येई, तर कधी संताप येई.

एके दिवशी रात्री आम्ही माताजींजवळ बोलत बसलो होतो. बोलता बोलता सती जाण्याच्या प्रथेची गोष्ट निघाली. तेव्हा माताजी म्हणाल्या, ''तुम्हाला एका सतीची कथा सांगते.'' त्यांनी कथा खाली दिल्याप्रमाणे सांगितली.

''एका गृहस्थाला एक मुलगी होती. ती अत्यंत सुंदर होती. बापाने लहानपणीच मुलीचे लग्न केले नाही. मुलगी वाढली. प्रौढ झाली. तिचे एका गरीब तरुणावर प्रेम होते. परंतु पित्याने एका श्रीमंत जहागीरदाराबरोबर तिचे लग्न लावले. पित्याने मुलीचे पैसे भरपूर घेतले. ती मुलगी दु:खीकष्टी होती. परंतु दिवस नेत होती. त्या जहागीरदाराच्या पहिल्या बायकाही होत्या. त्यांनाही मूलबाळ नव्हते. त्या नवऱ्याची संपत्ती माहेरी नेत; पतीला वाटेल तसे बोलत. पती 'ब्र' काढीत नसे. पुढे काय झाले, या दु:खीकष्टी तरुणीचा प्रियकर तिच्या या गावी आला. गावाबाहेरच्या एका देवळात उतरला. तरुणीला ती गोष्ट कळली. एके दिवशी सकाळी पूजासाहित्य घेऊन ती त्या

मंदिरात गेली. तिच्या प्रियकराला उचंबळून आले. तो तिच्याकडे धावणार, इतक्यात तिने बोटाने दूर राहा, अशी खूण केली. ती म्हणाली– ''नाथ, तुम्ही माझे हृदयदेव. माझे हृदय मी तुम्हाला दिले आहे. ह्या देहावर दुसऱ्याची सत्ता आहे. या देहाला हात नका लावू. तुम्ही समोर बसा. तुमची मला पूजा करू दे. तुम्ही माझे देव.'' ती पूजा करी, त्याचे ध्यान करी व निघून जाई.

ही गोष्ट सर्व गावभर पसरली. चवचाल लोक चाहटळपणा करू लागले. ती प्रेममूर्ती पूजासाहित्य घेऊन निघाली की, चावट लोक तिच्या पाठीस लागत. कोणी दगड मारीत, कोणी फुले मारीत. परंतु ती शांत असे, आपल्या प्रेमसमाधीत मग्न असे. पुढे या चावट लोकांनी तिचे ''उदबत्ती'' असे नाव ठेवले. ती प्रियकराची पूजा करावयास निघाली की, ''उदबत्ती वास द्यायला चालली,'' असे ते वात्रट लोक म्हणत.

पुढे तो वृद्ध जहागीरदार आजारी पडला. त्याच्या पहिल्या बायका बरोबर घेता येईल तेवढे डबोले घेऊन माहेरी गेल्या. म्हातारा क्षयी झाला. त्याच्या कफाला, थुंकीला घाण यायची. कोणी जवळ उभे राहिना. अशा वेळेस ती तरुणी त्याची सर्व सेवाचाकरी करू लागली. ''आताच माझी तुम्हाला जरुरी आहे.'' असे ती म्हणे. तो वृद्ध पती रडे. शेवटी पती मरण पावला. गावातले लोक जमले. ''उदबत्तीला आता प्रियकराकडे जायला अडचण नाही, मार्ग मोकळा झाला.'' असे कोणी म्हणाले.

परंतु त्या तरुणीने, ''मी सती जाणार आहे; तयारी करा.'' असे सांगितले. सारे चकित झाले. सिद्धता झाली. प्रेताबरोबर ती तरुणी अग्निज्वाला कवटाळण्यासाठी आनंदाने निघाली. बाजारातून प्रेतयात्रा चालली. ती तरुणी म्हणाली, ''आज उदबत्ती असा वास सोडणार आहे की, तो कधीही नाहीसा होणार नाही.'' टिंगल करणारे प्रणाम करून पाठोपाठ निघाले. सरण रचण्यात आले. पतीला मांडीवर घेऊन ती तरुणी बसली. तिने हाताने अग्नी पेटविला. कापराच्या राशींनी पेट घेतला. सतीचा सुगंध दशदिशांत गेला !

आपली प्रियकरीण सती जात आहे, हे देवळातील त्या प्रियकराला कळले. तोही देवळातून निघाला. त्यानेही त्या भडकणाऱ्या ज्वालात उडी घेतली. सारे लोक नि:स्तब्ध होऊन पाहात होते. पुढे तेथे दोन वृंदावने उभारण्यात आली. ती अजून दाखवतात.''

अशी गोष्ट सांगून माताजी म्हणाल्या, ''ही खरोखर घडलेली गोष्ट आहे. म्हैसूरकडची ही गोष्ट आहे.'' मला वाटते माताजींनी ती वृंदावने स्वत: पाहिल्याचेही सांगितले असावे. त्या गावच्या लोकांनी त्यांना ती गोष्ट सांगितली होती. त्यांनी आम्हाला सांगितली.

ती गोष्ट ऐकून आम्ही खोलीत गेलो. त्या गोष्टीचा माझ्या मनावर भयंकर परिणाम झाला. मला तर रात्रभर झोप येईना. मानवी जीवनात केवढाले हे त्याग, केवढी ही धीरोदात्तता, केवढा ध्येयवाद !

१९३२–३३ मध्ये नाशिकच्या तुरुंगात असताना ही गोष्ट मी लिहून काढली. ती तशीच पडून होती. परंतु त्या गोष्टीत आणखी काही फेरफार करून प्रस्तुत कथा आज मी प्रसिद्ध करण्यासाठी देत आहे. मूळची सत्यकथा इतकी उदात्त आहे व इतकी करुणरसपूर्ण आहे की, तिच्यावर एखादा महाकवी महाकाव्य लिहू शकेल, एखादा प्रतिभावान नाटककार दिव्य नाटक लिहू शकेल, एखादा थोर बोलपट–लेखक बोलपट लिहू शकेल, एखादा अमर कथालेखक मनोरम व हृदय हलवणारी कथा लिहू शकेल !

परंतु मी लिहिलेली कथा साधी आहे. मूळच्या कथेत मी काही फेरफार केले आहेत. कोणते केले? बापाने मुलीचे लग्न ती वयात येईपर्यंत का केले नाही? मूळच्या कथेवरून एवढेच दिसते की, पित्याला भरपूर पैसे पाहिजे होते. त्याने मुलगी रूपयौवनसंपन्न झाल्यावरच तिला विक्रीसाठी बाहेर काढले. लहान वयात मुलीला विकले तर पैसे कमी मिळतील. मोठी करून व डोळ्यांत भरण्यासारखी करून विकली तर अधिक पैसे मिळणार.

मला स्वभावत:च अत्यंत निष्ठुर अशी पात्रे कल्पिता येत नाहीत. पिता इतका कठोर कसा? असा विचार मनात आला. मुलीला विकण्यासाठी काही तरी कारण झाले असावे. तसेच त्याने मुलगी वाढवली, ती तिचे पैसे अधिक यावे म्हणून नव्हे, तर त्याचा दुसरा काही उदात्त हेतू होता. पित्याचा कठोरपणा सौम्य दिसण्यासाठी मी दोन–तीन गोष्टी मनच्या जोडल्या आहेत.

एक गोष्ट म्हणजे आपली मुलगी ब्रह्मवादिनी व्हावी, असे त्या पित्याला वाटत होते. म्हणून तो तिचे लग्न करू इच्छीत नव्हता. तो तिला शिकवू लागला व मुलगीही शिकू लागली. अशा गोष्टी कोठे कोठे दिसतात. मला असा एक थोर पिता माहीत

आहे. आज तो या मर्त्यलोकी नाही. परंतु त्या ध्येयार्थी पित्याची इच्छा असे की, आपल्या मुलीने विद्वान व्हावे, वेदांती व्हावे, गीताउपनिषदे सांगणारी व्हावे. त्या पित्याच्या निधनामुळे त्याची ती इच्छा अपुरी राहिली; परंतु त्याची अशी इच्छा होती, ही गोष्ट सत्य आहे.

हा मला मिळालेला जीवनातील एक अनुभव, मी पाहिलेले हे एक दृश्य, ह्या गोष्टीतील पिता रंगवताना मी उपयोजिले. पिता ''माझी मुलगी मैना ब्रह्मवादिनी होणार'' असे म्हणू लागला व मुलगीही म्हणू लागली. ''मी ब्रह्मवादिनी होणार.''

आपली मुलगी ब्रह्मवादिनी व्हावी, म्हणून तळमळणारा पिता तिला पुढे का विकतो? त्यासाठी मी दुसरी गोष्ट योजिली. ती म्हणजे अशी की, वृद्धपणी या मुलीच्या आईबापास मुलगा होतो, इतके दिवस मैना एकुलती एक मुलगी होती. परंतु आता मुलगा झाला. मग काय विचारता? वृद्ध आईबापांचा आनंद गगनात मावेना. पुत्राशिवाय गती नाही, असे आपण ऐकत आलो. सद्गती देणारा पुत्र आला. ब्रह्मवादिनी मैनेचा पित्याला विसर पडतो. त्याचे सारे प्रेम या नवीन जीवाभोवती जमा होते. या मुलाचे पुढे कसे होईल, याची त्याला चिंता लागते. आपण म्हातारे झालो, जवळ ना शेत ना भात, ना मोठी इस्टेट. मुलाचे पुढे कसे होणार, ही काळजी त्या प्रेमळ पितृहृदयाला लागते.

'हर्मिट्' म्हणून एक इंग्रजी कविता आहे. त्या कवितेत देवाची भक्ती करणारा एक निपुत्रिक आहे. तो सदासर्वदा देवाची पूजाअर्चा करीत असतो. देवाचे ध्यान करीत असतो; परंतु यापुढे निपुत्रिकाला पुत्र होतो, तत्क्षणी तो भक्त देवबीव सारे विसरतो. ते नवीन बालक म्हणजे त्याचा देव. येणाऱ्याजाणाऱ्यांशी त्या मुलाचे गुणकीर्तन. ध्यानी मनी स्वप्नी तो मुलगा !

तसे या पित्याचे होते. ब्रह्मवादिनी मैनेवरचे त्याचे सारे लक्ष उडते व तो या पुत्राची चिंता करू लागतो. मग त्याच्या मनात विचार येऊ लागतात. ''आपली मुलगी मैना एखाद्या श्रीमंतास द्यावी व जे पैसे मिळतील, ते बाळाला ठेवावे.'' असे तो ठरवितो.

परंतु या दोन गोष्टींत तिसराही एक प्रवाह मी मिसळला आहे. पिता मुलगी ब्रह्मवादिनी होणार, असे म्हणे. मुलगीही मी ब्रह्मवादिनी होणार असे म्हणे. परंतु हे सारे शब्दांचे बुडबुडे होते. मैना ही आत्यंतिक वृत्तीची मुलगी मी दाखविली आहे. तिला सुवर्णमध्य माहीत नाही. ती उंच आकाशाला हात लावील, किंवा दरीत तरी पडेल. पृथ्वीवरचे राहणे जणू तिला पसंत नाही.

तिच्या मनात प्रेम उत्पन्न होते, प्रेमवासना, कामना उत्पन्न होतात. परंतु या प्रेमाची देणगी कोणाला अर्पावयाची, ते तिला कळत नाही; परंतु गोपाळ येतो. त्याची वाणी, त्याचे रूप, त्याची वृत्ती तिला मोह पाडतात. मैना गोपाळाची राधा होते व तिचा तो मुरलीधर होतो. त्यांचे प्रेम वाढत जाते; परंतु मर्यादा सांभाळतात. ती दोघे एकमेकांस सांभाळतात. एकमेकांस इशारा देतात, सावध करतात.

परंतु पित्याच्या लक्षात ही गोष्ट येते. जिला आपण ब्रह्मवादिनी करणार होतो, ती प्रेमात पडलेली तो पाहतो. मनात खेळवलेल्या मनोरथांची माती होते. ध्येयार्थी माणसालाच ध्येयहानीने किती दु:ख होते, ते समजते. आपण रात्रंदिवस मनात जे स्वप्न घोळविले, ते भंगावे, यासारखे दु:ख नाही. पिता जणू चिडतो. आपल्या आकांक्षांना काडी लावणाऱ्या मुलीवर तो सूड घेऊ पाहतो. मनुष्याचा अहंकार दुखवला गेला. तो भग्नमनोरथ झाला म्हणजे तो काय करील, याचा नेम नसतो. अर्थात ही केवळ सूडवृत्तीही मी जरा सौम्य केली आहे. सूड म्हणून व लहान पुत्राच्या भावी सुखासाठीही मैना विकावी, असे पिता ठरवतो.

असे फेरफार करून पिता कमी कठोर दिसावा, त्याचीही मनोरचना, त्याचे मानसिक विक्षेप दिसावे, असा थोडाफार प्रयत्न मी केला आहे.

तो श्रीमंत वृद्ध जहागीरदारही पुन्हा लग्न का करतो? त्याच्या पहिल्या बायका असतात; परंतु त्याला मूलबाळ होत नाही. ज्याच्या घरी मूल नाही किंवा मुलगा नाही, त्याच्या घरी आमचे गादीवाले महाराज अन्न घेत नाहीत. श्रियाळ व चांगुणा यांचा एकुलता एक मुलगा मारल्यावर तो अतिथी पुन्हा म्हणतो, ''आता तुमच्याकडे जेवू कसा? तुमच्या घरात पुत्र नाही. निपुत्रिकाचे तोंडही पाहू नये. मग तेथे भोजन करणे तर दूरच राहिले !''

आपल्या समाजात हे असे विचार आहेत. मग ते यजमान पुत्र व्हावा म्हणून अट्टाहास करतात, ते पुन:पुन्हा लग्ने लावतात आणि हे गादीवाले महाराज लग्ने जमवून देतात. मध्यस्थी केल्याबद्दल त्यांना दलालीही मिळते आणि वृद्ध जहागीरदारास मूलबाळ होणे अशक्य असले, तर स्वत: हे अनुग्रह करतात !